१२६६०

जा.क्र.साआ/तांत्रिक/कक्ष-15/परिपत्रक/८६६/2017
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५.
दिनांक : 5 एप्रिल, 2017

प्रति,
कार्यकारी संचालक,
-------------------- सहकारी साखर कारखाना लि.,
-------------------, ता. -----------------------,
जि. ------------------ (सर्व)

## परिपत्रक

**विषयः- सहकारी साखर कारखान्यांना यंत्रसामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकामासाठी भांडवली खर्च मर्यादा वाढविणेबाबत.**

संदर्भ:-1. शासन निर्णय क्रमांक ससाका-102000/2973/प्र.क्र.128/3-स दिनांक 22/05/2000.
2. शासन निर्णय क्रमांक ससाका-2017/प्र.क्र.51/3-स दिनांक 25/03/2017.

उपरोक्त संदर्भीय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

2. राज्यस्तरीय मशिनरी खरेदी समितीचे कामकाज शासन आदेश क्रमांक सीएसके 1074/7049/13-स दिनांक 10/6/1976 अन्वये साखर संघाकडे होते. शासन निर्णय सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक ससाका 3290/ 8362/ प्र. क्र. 56/3 स दिनांक 18/1/1994 अन्वये साखर आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून सदर समितीचे कामकाज त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्याप्रमाणे शासन निर्णय दिनांक 9/1/1996 अन्वये साखर आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली पुनगठीत केलेल्या सिव्हील बांधकाम समिती कामकाज सोपविण्यात आले होते. परंतू हे कामकाज साखर संघाच्या अध्यक्षतेखाली साखर कारखान्यांचे काही अध्यक्ष, साखर धंदयाशी संबधीत संस्थाचे प्रतिनिधी, शासनाचे प्रतिनिधी व साखर धंदा मशिनरीमधील तज्ञ यांची समिती असावी अशी साखर संघाची मागणी होती.

3. दिनांक 8 मार्च 2000 रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकित घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे विस्तारीकरण जुन्या यंत्रसामुग्रीच्या जागी आधुनिक यंत्रसामुग्री बसविणे, उपपदार्थाचे प्रकल्पासाठी लागणारी यंत्रसामुग्री खरेदी करणे, बांधकामासंबाधीच्या निविदा मंजूर करणे. इत्यादी बाबीसाठी वेगवेगळया समित्या दि. 8 मार्च 2000 रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय यंत्रसामुग्री खरेदीसाठीच्या समिती पुर्नगठीत करण्यात येवून सदर समितीच्या वित्तीय मर्यादा शासन निर्णय 22/05/2000 अन्वये निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

4. तसेच दिनांक 22/05/2000 रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या वित्तीय मर्यादेस अनुसरुन यंत्रसामुग्रीच्या किंमतीमध्ये फार मोठया प्रमाणावर वाढ झाल्यामुळे यंत्रसामुग्री खरेदी व स्थापत्य कामांच्या निविदा मंजूरीच्या वित्तीय मर्यादा दिनांक 25 मार्च 2017 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर मर्यादेमध्ये कारखान्याने कारखानास्तरावर भांडवली खर्चाची वित्तीय मर्यादा रक्कम रु. 50.00

लाखावरुन रु. 2.00 कोटीपर्यंत करण्यात आलेली आहे. तरी सदर वित्तीय मर्यादेनुसार रुपये 10.00 लाखापेक्षा जास्त रकमेचे अंदाजपत्रकास साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडून तांत्रिक मान्यता निविदा मागविण्यापूर्वी घेण्यात यावी. तसचे साखर कारखान्यांनी आपल्या स्तरावर वरील मर्यादेपर्यंत भांडवली खर्च करताना पुढील अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.

**अटी व शर्ती.**

1. सहकारी साखर कारखान्यांना यंत्र सामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकाम विषयक वरील मर्यादेपेक्षा अधिक मर्यादेची कामे या कार्यालयाच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेशिवाय करता येणार नाहीत.

2. वर नमूद केलेल्या मर्यादे पर्यंत कारखान्यांनी आपल्या अधिकारात करावयाच्या कामासाठी नॅशनल फेडरेशन, वसंतदादा साखर संशोधन संस्था, मिटकॉन किंवा तत्सम संस्थाकडून तांत्रिक सल्ला घेऊन त्यानंतर भांडवली खर्च करावा.

3. असा भांडवली खर्च करण्यापुर्वी या खर्चाचा विषय साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या सभेच्या नियमीत विषय सूचीवर समाविष्ट करून घ्यावा. तसेच सदर खर्चाची बाब साखर कारखान्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नियमीत विषय सूचीवर करून कार्योत्तर मान्य करून घेणे बंधनकारक राहील.

4. वरील तक्त्यात नमुद मर्यादेपेक्षा अधिक रकमेची भांडवली खर्चाची कामे साखर कारखान्यांनी आपल्या स्तरावर आपल्या अधिकारात करून घेतल्यास ती आर्थिक अनियमीतता समजली जाईल व असा खर्च ज्या संचालक मंडळाच्या कालावधीत झालेला असेल ते संचालक मंडळ सदस्य वैयक्तीक व सामुहीकरित्या अशा अनियमिततेला जबाबदार समजून ते नियमानुसार कारवाईस पात्र राहतील.

5. वरील नमुद मर्यादेपर्यंत आपल्या अधिकारात कारखान्यांनी केलेल्या भांडवली खर्चाच्या सविस्तर नोंदी कारखान्याने स्वतंत्र नोंदवहीत नोंदवून ठेवल्या पाहीजे व त्या शासकीय लेखापरिक्षकामार्फत तपासणीस पात्र राहतील.

6. वरील नमुद मर्यादेपर्यंत भांडवली खर्च कारखान्यांनी पुरेसा स्वनिधी उभारून व आवश्यक असल्यास वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारून (बाहेरून कर्ज उभारण्याच्या मर्यादेत) केला पाहिजे. असा खर्च कोणत्याही परिस्थितीत कारखान्यास खेळत्या भांडवलातून करता येणार नाही.

7. कारखान्याने एका वेळेस खरेदी करावयाची यंत्रसामुग्री व स्थापत्य बांधकामे यावर होणारा खर्च वर नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक होणार असेल तर अशा बाबींवर करावयाचा खर्च कारखान्याने एकत्रितपणे केला पाहिजे व अशा खर्चास साखर आयुक्तालयाची किंवा/आणि राज्यस्तरीय समिती यापैकी जे लागू असेल त्यांची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक राहील.

8. ज्या बाबी "टर्न-की" च्या आधारे खरेदी कराव्या लागतात त्या सर्व बाबी एकत्रित करण्यात याव्यात. अशा टर्न-की स्वरूपाच्या बाबी एकत्रित करून येणारा खर्च गृहीत धरून तो खर्च वर नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असल्यास किंवा अशा बाबींवर एका वर्षात होणारा खर्च वरील मर्यादेपेक्षा अधिक होत असल्यास तो ज्या मंजुरी अधिकारी/समितीच्या कक्षेत मोडत असेल त्यांचेकडे प्रस्ताव पुर्व मंजुरीस्तव सादर करणे बंधनकारक राहील. 2.00 कोटीच्या मर्यादित कारखान्यांच्या स्तरावर खर्च करता यावा या उद्देशाने अधिक किंमतीच्या कामाचे तुकडे करून कारखान्यांच्या स्तरावरील खर्चाच्या मर्यादेत तो प्रस्ताव बसवून कारखान्याने खर्च करणे आर्थिक अनियिमितता समजली जाईल व ही बाब संचालक मंडळाविरूध्द कारवाईस पात्र समजली जाईल.

वर नमुद मर्यादेपर्यंतचा भांडवली खर्च कारखान्याच्या अधिकारात येत असल्यास तसा खर्च केल्या नंतर त्याचा सविस्तर तपशिल साखर आयुक्त कार्यालयास तात्काळ सादर करावा.

वरील प्रमाणे अटी/शर्तीची तंतोतंत पुर्तता करून संबंधीत सहकारी साखर कारखान्यांनी वर नमुद केलेल्या विहीत मर्यादेपर्यत भांडवली खर्च (यंत्र सामुग्री व स्थापत्य बांधकाम) आपल्या स्तरावर करण्यात यावा.

05-04-17

**आयुक्त,साखर**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**